हस्तपुस्तिका-१

## १) विधी खात्याची संघटना, कार्ये आणि हयाबाबतचा तपशील -

बृहन्मुंबई महानगरपालिका विधि खात्याचा संबंध मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६, मुंबई दुकाने आणि आस्थापना अधिनियम, १९४८, अन्नभेसळ प्रतिबंधक अधिनियम, १९५४, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संवर्धन अधिनियम, १९७५ आदी अधिनियम, विकास नियंत्रण विनियम व इतर उपविधी वगैरेच्या अंमलबजावणी संबंधातील महानगरपालिकेच्या वतीने वा महानगरपालिकेविरुध्द चालविण्यात येणा-या न्यायालयीन खटल्यांशी संबंधीत आहे.

न्यायालयीन खटले दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही प्रकारचे असतात. ते वेगवेगळया न्यायालयांमध्ये चालविले जातात. त्यात सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयांमधील विनंती अर्जासह (रिट पिटीशन) प्रकरणांचा तसेच, इतर न्यायाधिकरणे, लघुवाद न्यायालय, मानवी हक्क आयोग, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण न्यायालय, कामगार व औदयोगिक न्यायालये, सहकारी न्यायालये वगैरेचा समावेश होतो.

महापालिकेच्या मालमत्तांसंबंधी व अन्य विविध प्रकरणांसंबंधी करारनामे, भाड़ेपट्टा, मक्ता, खरेदीखत, महापालिकेच्या मालमत्तेसंबंधातील समझोत्यांची निवेदनपत्रके बनविणे, विकास नियंत्रण नियमावली व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम हया अन्वये महापालिकेकडून ताब्यात घ्यावयाच्या मालमत्तांच्या मालकांचा शोध घेऊन मालमत्तांवरील मालकी हक्क निश्चित करणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेल्या अनेक प्रकल्पांबाबत करारनामे बनविणे इत्यादी कामेसुध्दा सदर खाते पाहते.

नागरी प्रशासनास ज्या ज्या वेळी आवश्यकता भासते त्या त्या वेळी खात्यातर्फे कायदेविषयक सल्ला / मत दिले जाते.

मुंबईतील विविध न्यायालयांत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने वकिल म्हणजेच कनिष्ठ कायदा अधिकारी, सहाय्यक कायदा अधिकारी आणि उप कायदा अधिकारी दावे चालविण्यासाठी उभे राहतात. या खात्याचा व्यवहार कायदेविषयक दस्तऐवजांशी असल्यामुळे कोणत्याही प्रकारचा निकालाचा संबंध येत नाही.

**क्रं.एलओ/एलइए/६८९**
**दि.२२.०१.२०२०**

**सही/-**
**दि.२२.०१.२०२०**
**कायदा अधिकारी**
**विधी खाते**